श्री. पी.एम.गुजर, कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांची स्वेच्छा निवृत्ती पूर्वसूचना मंजुर करुन त्यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीस मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः आपना-०२१८/प्र.क्र.१६१/पापु-१५

सातवा मजला,नवीन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल
लोकमान्य टिळक मार्ग,क्रॉफर्ड मार्केट समोर मुंबई-४०० ००१
तारीख: १७ मे,२०१८

वाचा -

1) **श्री. पी.एम.गुजर ,कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचा दिनांक १३.३.२०१८ रोजीचा अर्ज.**
2) **संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचे पत्र क्र. प्रशासन/आस्था-१/पी.एम.गुजर/कभू/स्वे.से.नि./वै.पं/३२५/२०१८ दिनांक ४.५.२०१८**
3) **शासन अधिसूचना,वित्त विभाग क्रमांक सेनिवे-२०१५/प्र.क्र.७५/सेवा-४, दिनांक १२ एप्रिल,२०१६.**

प्रस्तावना -

श्री. पी.एम.गुजर, कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी दिनांक १३.३.२०१८ रोजीच्या अर्जान्वये स्वेच्छासेवानिवृत्तीची पूर्वसुचना दिली आहे.

२. श्री. पी.एम.गुजर, कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांची स्वेच्छा सेवानिवृत्तीची पूर्वसूचना स्वीकारुन त्यांना दिनांक १३.६.२०१८ (म.पू.) शासन सेवेतून कार्यमुक्त करण्याबाबत संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकरस यंत्रणा यांनी सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहे.

शासन आदेश-

श्री. पी.एम.गुजर कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्याविरुद्ध कोणतीही शिस्तभंगविषयक,फौजदारी किंवा इतर कोणतीही प्रतिकूल कारवाई प्रलंबित अथवा

प्रस्तावित नसल्याचे तसेच त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे शासकीय येणे शिल्लक नसल्याचे संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी प्रमाणित केले आहे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र. ६६ (१) मधील तरतूदीनुसार श्री. पी.एम.गुजर कनिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांची स्वेच्छा सेवानिवृत्ती स्विकारुन त्यांना दिनांक १३.६.२०१८ (म.पु.) पासून शासन सेवेतून कार्यमुक्त करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१७१२३७३०८८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Laxman Mohandule

Digitally signed by Ramesh Laxman Mohandule
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=350d84bf5bb049d932c166c9946998dc54a03422ca8777398e5b987ad3e311a6, cn=Ramesh Laxman Mohandule
Date: 2018.05.17 15:31:04 +05'30'

(र.ल.मोहंडुळे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल भवन, शिवाजी नगर,पुणे
२. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, अमरावती
३. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
४. श्री.पी.एम.गुजर, कनिष्ठ भूवैज्ञानिक,यांना संचालनालयामार्फत
५. निवडनस्ती (कार्यासन -पापु-१५), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.